**वादीतर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** अमीर अब्दुलमजीद लतीफ.

**वय** - ४५ वर्ष, **व्यवसाय** - बॉड रायटर,

**राहणार.-** रवळनाथ कॉलनी, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**वादीतर्फे वकील श्री. एस. आर. पोवार यांच्यामार्फत.**

**१.** मला साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळालेले आहे. मी सन २००२ पासून बॉड रायटरचे काम करीत आहे. माझ्याकडे दस्तलेखनाचा परवाना नाही. मी वडिलांसोबत बॉड रायटरचे काम करतो. माझ्या वडिलांकडे दस्तलेखनाचा परवाना होता.

**२**. माझ्याकडे दि. १६.०३.२००४ रोजी आमच्या तहसिल कार्यालया जवळील ऑफिसमध्ये शामराव कातकर व सावित्री पारळे खरेदीपत्राच्या कामासाठी आल्यामुळे मी त्यांना ओळखतो. त्यांना मडिलगे गावातील गट क्र. ३११ चे खरेदीपत्र करायचे होते. सदरचे खरेदीपत्र सावित्री पारळे यांनी शामराव कातकर यांना करुन दिले होते. त्यासाठी त्यांनी सदर मिळकतीचा सातबारा उतारा सोबत आणला होता.

**३**. ते आमच्याकडे आल्यानंतर आम्ही सावित्री पारळे यांना स्टँप पेपर आणायला सांगितले होते. तिने आणून दिलेल्या स्टँपवरती मी तिच्या सांगण्याप्रमाणे खरेदीपत्राचा मजकूर लिहून दिलेला आहे. त्यांच्यासोबत साक्षीदार म्हणून गुंडू कडगावकर, विनोद लकांबळे आणि दिनकर पारळे व एक भोसले नावाची व्यक्ती आली होती. मी दस्त लिहून झाल्यानंतर सर्वांना वाचून दाखविला होता. सावित्री पारळे व इतरांनी त्यातील मजकूर बरोबर असल्याचे कबूल केल्यानंतर, त्यावरती सावित्री, साक्षीदार आणि मी सही केली होती. मी त्यावरती दस्तूर म्हणून माझी स्वाक्षरी केली आहे.

**४**. मी त्यांना दस्त लिहून दिल्यानंतर नोंदविण्यासाठी रजिस्टर ऑफिसला पाठविले होते. मला मी लिहिलेला दस्त दाखविल्यास ओळखू शकतो. आता मला निशानी ३७ सोबत असलेल्या यादीतील मूळ दस्त क्र. ३९४/२००४ दाखविला. त्यातील मजकूर माझ्या

हस्ताक्षरात लिहिलेला असून तो खरा व बरोबर आहे. त्याला **नि. क्र. ५५** देण्यात येते.
**सरतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादी क्र. १, २ व ४ साठी उलटतपास – श्री. एस. एम. देशपांडे वकील यांच्यामार्फत.</u>**

५. प्रतिवादी वकिलांचा पुकारा केला असता गैरहजर. सबब, उलटतपास नाही.

**<u>प्रतिवादी क्र. ३ साठी उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील यांच्यामार्फत.</u>**

६. मला दस्त लिहिण्यासाठी परवान्याची आवश्यकता असते याबाबत माहिती आहे. माझ्या वडिलांनी दस्त लिहिल्यास ते स्वतः दस्तूर करतात. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे वडिल दस्त लिहिण्याचे स्वतंत्र कामे करतो. मला दस्त लिहिल्यानंतर त्याची नोंद घ्यावी लागते याबाबत माहिती नाही.

७. मी दस्त लिहिण्यापूर्वी खरेदी देणार व घेणार यांना ओळखत नव्हतो. मी त्यांची ओळख मतदान पत्रावरुन केली होती. मी त्यांची ओळखपत्रे दस्तासोबत दाखल केलेली नाहीत. माझ्याकडे आज पाहिलेल्या ओळखपत्रांचे अभिलेख नाहीत. दस्त लिहिण्यासाठी खरेदी देणार व घेणार सकाळी ११.३० ते १२.०० च्या दरम्यान आमच्याकडे आले होते. त्यांनी माझ्याकडे चालू वर्षाचा सातबारा उतारा दिला होता.

८. मला दस्त करण्यापूर्वी मिळकतीचे सरकारी मूल्यांकन करावे लागते याबाबत माहिती आहे. विक्री मिळकतीचे मूल्यांकन खरेदी देणार व घेणार यांनी करुन आणलेले होते. त्यांनी दावा मिळकतीचे मूल्यांकन सांगितले नव्हते. खरेदी देणार सावित्री पारळे यांनी मला मूल्यांकन सांगितले होते. माझ्यासमक्ष त्यांचा पैसे देण्या–घेण्याचा व्यवहार झाला नव्हता. माझ्या भावाचा स्टँप विक्रीचा व्यवसाय आहे. मी सावित्री पारळे यांना मूल्यांकनावरती लागणारा स्टँप काढून दिला होता.

९. मी मूल्यांकन काढून दिल्यानंतर त्यांनी कोणाकडून स्टँप आणला होता हे मला आठवत नाही. त्यांनी दोन हजार रुपयांच्या मूल्याचे स्टँप आणले होते. त्यांनी मला दिलेल्या सातबारा उता–यावरती सहा लोकांची नावे होती. त्यामध्ये दोन लोकांची स्वतंत्र क्षेत्रे आणि

इतरांची एकत्रीत दाखविलेली होती. त्यामध्ये मारुती व गणपती पारळे यांची स्वतंत्र क्षेत्रे दाखविले होते आणि इतरांची सामाईक नावे दाखविली होती.

**१०.** मला सावित्री पारळे यांनी सांगितलेल्या चर्तुःसिमाचा कागद पाहिलेला नव्हता. तिने चर्तुःसिमा दिलेल्या शेजारच्या जमिनींचे क्षेत्र सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, विक्री दस्त सामाईक जागेबाबत असल्यास आम्हाला चर्तुःसिमा घालून दस्त लिहिता येत नाही. सदरची मिळकत सावित्री पारळे यांना बक्षीसपत्राने मिळाली होती. मी त्याबाबतची कागदपत्रे पाहिली नव्हती, मी त्यांच्याकडे मागणी केलेली नव्हती. साक्षीदार गुंडूचे पुर्ण नाव गुंडू शंकर कडगावकर असे आहे. तो कोणत्या गावात राहतो ते मला आता आठवत नाही. मी साक्षीदारांची मतदानपत्रे पाहिली होती. मला विनोद लकांबळे याचे पुर्ण नाव आठवत नाही, मला तो कोणत्या गावात राहतो याबाबत सांगता येणार नाही.

**११.** मला दि. १६.०३.२००४ रोजी या दस्ताव्यतिरिक्त इतर दस्त लिहिल्याचे आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी या दाव्यातील सदर दस्ताचे लिखाण केलेले नसून माझ्या समक्ष कोणीही हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी तयार दस्तावरती दस्तूर म्हणून खोटी स्वाक्षरी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दस्त नोंदणी करण्यासाठी जात नसल्यामुळे मला ओळखदारांबाबत माहिती नाही. मी दस्तावरील ओळखदारांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE
Date: 2024.06.18 17:49:47 +0530

दिनांक – १८.०६.२०२४.

आजरा.

(आर. पी. थोरे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.